स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र शासन**
उपवनसंरक्षक,पुणे वन विभाग, पुणे यांचे कार्यालय
सेनापती बापट मार्ग, पुणे 411 004

दूरध्वनी- 020 2566 0593
ई-मेल-dycfpune@gmail.com

क्रमांक:- अ/ कक्ष-4.2/ जमीन/ 186 /2023-24 दिनांक:- 22/05/2023

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (प्रा.)
पुणे

**विषय** - Diversion of 48.55 ha.forest land for construction of Pune Ring Road Western (PRRW) of 68.80 km start at Urse and end at Varve (Kelwade village) of pune districtin the state of Maharashtra. (FP/MH/ROAD/23385/2016)

**संदर्भ** - 1.महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील पत्र क्र.एफएलडी-1923/प्र.क्र.139/फ-10 दि.08/05/2023

2.मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,म.रा.नागपुर यांचेकडील पत्र क्र.कक्ष-17/नोडल/पुणे/आयडी-13725 (25) /406 दि.11/05/2023

उपरोक्त विषयांकित प्रस्तावामध्ये महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग,मंत्रालय,मुंबई यांचे कार्यालयाकडुन संदर्भपत्र क्र.1 नुसार 1 ते 10 त्रुटी उपस्थित करण्यात आलेल्या असुन सदर उपस्थित त्रुटींची पुर्तता करणेबाबत मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,म.रा.नागपुर यांचे कार्यालयाकडुन संदर्भ पत्र क्र.2 नुसार कार्यकारी अभियंता,पुणे चक्राकार महामार्ग व या कार्यालयास कळविण्यात आले आहे.त्या अनुषंगाने उपस्थित त्रुटींबाबत पुर्तता अहवाल खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

४२१३

| त्रुटी क्र.1 | त्रुटी तपशील | पुर्तता |
| --- | --- | --- |
| 1 | प्रस्तावीत जमीनीमध्ये काही खाजगी वनजमीनीचा समावेश आहे. मौजे वेवड ओव्हळ येथील ग.नं.33 मधील एकुण क्षेत्र 6.76 हे. आर इतके आहे.त्यापैकी 0.1749 हे. इतके क्षेत्र वन (संवर्धन) अधिनियम, 1980अंतर्गत वळतीकरणासाठी प्रस्तावीत केले आहे. सदर ग.नं. 33 मधील केवळ 2.05 हे. क्षेत्रास खाजगी वन जमीन म्हणुन संबोधण्यात आले आहे. याव्यतिरीक्त गा.न.नं.7/12 मध्ये राज्यमार्ग (विशेष) क्र.1 करीता राखीव क्षेत्र 0.1749 हे. अशी सुदधा स्वतंत्र नोंद आहे. त्यामुळे प्रस्तावीत 0.1749 हे. क्षेत्र खाजगी वन म्हणुन संबोधलेल्या 2.05 हे. क्षेत्रातीलच आहे किंवा कसे? याबावत खात्री करण्यात यावी. | यावावत नमुद करण्यात येते कि, प्रस्तावीत वळतेकरण क्षेत्र हे ग.नं.33 मधील 2.05 हेक्टर क्षेत्रामधील आहे. |
| 2 | मौजे भरे येथील गट नं. 406/1/अ मधील सुमारे 12 हे. जमीन वन विभागाच्या नावे आहे. तर उर्वरीत जमीन अन्य संस्थाना भोगवटदार वर्ग-2 या धारणाधिकारावर वाटप झालेली दिसते. प्रस्तावीत जमीन केवळ वनविभागाच्या हिस्यातील आहे किंवा वाटप झालेल्या संस्थाच्या हिस्स्याची देखील आहे. याचा बोध होत नाही. अन्य संस्थाच्या हिस्स्यातील जमीन असल्यास ती देखील वन (संवर्धन) अधिनियम,1980 अंतर्गत केंद्र शासनाची मंजुरी घेण्यास पात्र आहे किंवा कसे? याबाबत खात्री करण्यात यावी. | याबावत नमुद करण्यात येते कि, प्रस्तावीत वळतेकरण क्षेत्र हे गट नं. 406/1/अ मधील वनविभागाचे नावे असलेल्या 12 हेक्टर राखीव वन क्षेत्रातील आहे. |
| 3 | मौजे थोपटेवाडी येथील गट नं. 136, 137 मधील जमीनीच्या 7/12 मध्ये भोगवटदार वर्ग-2, राखीव वन, खाजगी वन, सिंलीग कायदा अशा भिन्न भिन्न नोंदी आहेत. उपवनसंरक्षक यांनी राखीव वन म्हणुन जमीन वळतीकरणासाठी प्रस्तावीत केली आहे. त्यामुळे सदर जमीनीचा वैधानिक दर्जा नेमका राखीव वन म्हणुन गृहीत धरावा की खाजगी वन म्हणुन गृहीत धरावा याबाबत उपवनसंरक्षक यांना विचारणा करण्यात यावी | याबाबत नमुद करण्यात येते कि, सदर क्षेत्राचा दर्जा वैधानिक दर्जा हा खाजगी वन असा असुन सदर क्षेत्र हे शासनाकडे संपादित झालेले आहे.महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) कायदा,1975 अन्वये संपादित वन जमीनीवर नोंद घेणे बाबत शासन परिपत्रक क्र.एस-30/2004/प्र.क्र.200/ल-6 दि.14/07/2005 नुसार मार्गदर्शक सुचना जारी केल्या आहेत त्यानुसार सदरचे क्षेत्र हे शासन निहीत झाल्यामुळे 7/12 अभिलेख सदरी महाराष्ट्र शासन राखीव वन अशी नोंद घेतली आहे. |
| 4 | मौजे थोपटेवाडी येथील गट नं. 156, 157, 158, 159 मधील जमीनीच्या 7/12 मध्ये भोगवटदार वर्ग-1 व संपुर्णपणे खाजगी व्यंक्तीच्या नावे आहेत. उपवनसंरक्षक यांनी राखीव | याबाबत नमुद करण्यात येते कि, सदर क्षेत्राचा दर्जा वैधानिक दर्जा हा खाजगी वन असा असुन सदर क्षेत्र हे शासनाकडे संपादित |

| | | |
|---|---|---|
| | वन म्हणुन जमीन वळतीकरणासाठी प्रस्तावीत केली आहे. सबब, सदर जमीन राखीव वन असल्याचा पुरावा म्हणुन आवश्यक कागदपत्रे सादर करण्याबाबत उपवनसंरक्षक यांना कळविण्यात यावे | झालेले आहे.महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) कायदा,1975 अन्वये संपादित वन जमीनीवर नोंद घेणे बाबत शासन परिपत्रक क्र.एस-30/2004/प्र.क्र.200/ल-6 दि.14/07/2005 नुसार मार्गदर्शक सुचना जारी केल्या आहेत त्यानुसार सदरचे क्षेत्र हे शासन निहीत झाल्यामुळे 7/12 अभिलेख सदरी महाराष्ट्र शासन राखीव वन अशी नोंद घेतली आहे. |
| 5 | मौजे थोपटेवाडी येथील गट नं. 155 मधील जमीनीच्या 7/12 मध्ये भोगवटदार वर्ग-1 व खाजगी व्यक्तीचे नाव नमुद आहे. उपवनसंरक्षक यांनी राखीव वन म्हणुन जमीन वळतीकरणासाठी प्रस्तावीत केली आहे. 7/12 उताऱ्यावर खाजगी वनासंबधी कोणतीही नोंद नाही. सबब, सदर जमीन खाजगी वन असल्याची खात्री करण्याबाबत उपवनसंरक्षक यांना कळविण्यात यावे | याबाबत नमुद करण्यात येते कि, सदर क्षेत्राचा दर्जा वैधानिक दर्जा हा खाजगी वन असा असुन सदर क्षेत्र हे शासनाकडे संपादित झालेले आहे.महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) कायदा,1975 अन्वये संपादित वन जमीनीवर नोंद घेणे बाबत शासन परिपत्रक क्र.एस-30/2004/प्र.क्र.200/ल-6 दि.14/07/2005 नुसार मार्गदर्शक सुचना जारी केल्या आहेत त्यानुसार सदरचे क्षेत्र हे शासन निहीत झाल्यामुळे 7/12 अभिलेख सदरी महाराष्ट्र शासन राखीव वन अशी नोंद घेतली आहे. |
| 6 | मौजे मोरदरवाडी येथील ग.नं. 251 मधील एकुण क्षेत्र 1.97 हे. आर इतके आहे. त्यापैकी 0.3214 हे. इतके क्षेत्र वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत वळतीकरणासाठी प्रस्तावीत केले आहे. सदर गट नं. 251 मधील केवळ 0.16.75 हे. आर क्षेत्रास खाजगी वन जमीन म्हणुन संबोधण्यात आले आहे. त्यामुळे प्रस्तावीत 0.3214 हे. क्षेत्र खाजगी वन म्हणुन संबोधलेल्या 0.16.75 हे आर क्षेत्रातीलच आहे किंवा कसे ? याबाबत खात्री करण्यात यावी | मौजे मोरदरवाडी येथील ग.नं. 251 हे क्षेत्र खाजगी वनक्षेत्र असल्यामुळे 0.3214 हे. क्षेत्र प्रस्तावीत वळतेकरण दर्शविले आहे. |
| 7 | मौजे मोरदरवाडी येथील ग.नं. 348 मधील एकुण क्षेत्र 5.24 हे. आर इतके आहे. त्यापैकी 0.5177 हे. इतके क्षेत्र वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत वळतीकरणासाठी प्रस्तावीत केले आहे. सदर गट नं. मधील 2.58 हे. आर क्षेत्रास खाजगी वन जमीन म्हणुन संबोधण्यात आले आहे. | याबाबत नमुद करण्यात येते कि, प्रस्तावीत 0.5177 हे. क्षेत्र खाजगी वन म्हणुन संबोधलेल्या 2.58 हे. आर क्षेत्रातीलच आहे. |

| | | |
|---|---|---|
| | त्यामुळे प्रस्तावीत 0.5177 हे. क्षेत्र खाजगी वन म्हणुन संबोधलेल्या 2.58 हे. आर क्षेत्रातीलच आहे किंवा सदर ग.नं. मधील संपुर्ण क्षेत्रालाच वन (संवर्धन) अधिनियम, 1980 च्या तरतुदी लागु होतात ? यावावत उपवनसंरक्षक यांच्याकडुन माहिती घेण्यात यावी | |
| 8 | मौजे थोपटेवाडी येथील ग.नं. 242, मोरदरवाडी येथील ग.नं. 465, मारणेवाडी येथील ग.नं. 341, मौजे भरे येथील ग.नं. 406/2/1/2, मौजे पाचणे येथील ग.नं. 921 व वेबड ओव्हळ येथील ग.नं. 45 मधील प्रस्तावीत जमीनीचे 7/12 उतारे अप्राप्त आहेत. सदर उतारे सादर करण्यावावत संबंधिताना कळविण्यात यावे. | सदर 7/12 उतारे या सोवत सहपत्रित करण्यात येत आहे. |
| 9 | पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावीत जमीनीचे 7/12 उतारे व 10 वर्षांची पर्यायी वनीकरण योजना सादर करावी. | सदर दस्तऐवज यासोवत सहपत्रित करण्यात येत आहे. |
| 10 | उपवनसंरक्षक यांनी स्थळ पाहणी अहवालात वन्यप्राणी दिसुन येतात,असे नमुद केले आहे. मात्र, वन्यजीव मंजुरी अथवा उपशमन योजनांची आवश्यकता राहील किंवा कसे यावावत भाष्य केलेले नाही. याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे अभिप्राय घेऊन, माहिती सादर करावी. | यावावत नमुद करण्यात येते कि, सदर ठिकाणी वन्यप्राणी दिसतात मात्र सदर वळतेकरण क्षेत्रामध्ये त्यांचा फारसा वावर नसुन नमुद प्रस्तावास केंद्र शासनाचे मंजुरीनंतर wildlife mitigation plan तसेच प्रकल्प यंत्रणेकडुन ठरावीक साखळी क्रमांकावर वन्यप्राण्यांचे भ्रमणासाठी कॉरीडॉर तयार करुन घेण्यात येतील.तसे हमी पत्र प्रकल्प यंत्रणा यांचेकडुन घेतले असुन ते यासोवत सहपत्रित करण्यात येत आहे. |

वरील प्रमाणे त्रुटी पुर्तता अहवाल 4 प्रतीमध्ये यासोबत आपले माहितीस्तव सविनय सादर

**( राहुल पाटील,भावसे )**
**उपवनसंरक्षक,**
**पुणे वनविभाग,पुणे**

**प्रतिलिपी** - मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,म.रा.नागपुर यांना माहितीस्तव सविनय सादर

**प्रत** - कार्यकारी अभियंता,पुणे चक्राकार महामार्ग,मराराविम शिबीर कार्यालय,पुणे यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी